# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ३१६ गुरूवार दि.१९ जून २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## राज्यात सुमारे साडेअकरा लाख हेक्टरवर पेरण्या



मुंबई : राज्यातील विविध भागात मोसमी पाऊस सक्रिय झाला असून आतापर्यंत सुमारे ११.७० लाख हेक्टर शेतजमिनीवर पेरण्या झाल्या आहेत, अशी माहिती राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. पाऊस चांगला झाल्याने खतांची मागणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या खतांची उपलब्धता करून ठेवा. गरज भासल्यास आणखी मागणी करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत दिले.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील पीकपाणी, खते आणि बियाणे पुरवठा यांच्याबाबत कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, राज्यातील जवळपास सर्वच भागात मोसमी पाऊस सक्रिय झाला आहे. यंदा आतापर्यंत ११.७० लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. गेल्या वर्षी १४५.८२ लाख हेक्टरवर अंतिम पेरण्या झाल्या होत्या. त्या तुलनेत यंदा सरासरी आठ टक्के पेरण्या झाल्या आहेत. खरीप हंगामातील पूर्वमशागतीची कामे सुरू आहेत. राज्यातील काही भागात सतत पाऊस सुरू असल्याने पेरण्या खोळंबल्या आहेत असे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, सांगली आणि धाराशिव जिल्ह्यात शंभर टक्क्यांहून अधिक पाऊस झाला आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, जळगाव, सातारा, कोल्हापूर, जालना आणि लातूर जिल्ह्यात ७५ ते १०० टक्के पाऊस झाला आहे.

ठाणे, रायगड, नाशिक, नांदेड, परभणी, हिंगोली आणि बीड या जिल्ह्यात ५० ते ७५ टक्के पाऊस झाला आहे. पालघर, बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात २५ ते ५० टक्के पाऊस झाला आहे. नंदुरबार, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा जिल्ह्यात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील भागात येत्या दोन ते चार दिवसांत चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे असे रस्तोगी यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील सर्व धरणांच्या जलाशयाच्या पाणीसाठ्यात चांगली वाढ होत आहे, असे जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सांगितले. कर्नाटकातील अलमट्टी धरण प्रकल्पाचे मुख्य अभियंता यांच्याशी संपर्क साधला असून त्यांनी धरणात ५१५ मीटरपर्यंत पाणीसाठा करण्यात येईल असे सांगितल्याची माहिती कपूर यांनी यावेळी दिली

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा ; आता वाहन धारकांना मिळणार वार्षिक पास?

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बुधवारी टोल कर नियमांमध्ये मोठा बदल करण्याची घोषणा केली. यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. नितीन गडकरी यांनी सोशल मीडियाद्वारे याबाबत माहिती दिली. त्यांनी यावेळी,आता ३००० रुपयांना फास्टॅग पास मिळेल ज्यामुळे तुमचा प्रवास मोफत होईल, परंतु तो एका निश्चित कालावधीसाठी असेल असे त्यांनी म्हटले आहे.



१५ ऑगस्ट २०२५ पासून योजनेस सुरुतात केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, एका ऐतिहासिक उपक्रमात, १५ ऑगस्ट २०२५ पासून ३,००० रुपयांचा फास्टॅग आधारित वार्षिक पास सुरू करण्यात येत आहे. हा पास सक्रिय झाल्याच्या तारखेपासून एक वर्षासाठी किंवा २०० प्रवासांसाठी, जे आधी असेल ते वैध असेल. हा पास विशेषतः गैर-व्यावसायिक खाजगी वाहनांसाठी (कार, जीप, व्हॅन इ.) डिझाइन केला आहे आणि देशभरातील राष्ट्रीय महामार्गांवर अखंड प्रवास करण्यास सक्षम करेल असे म्हटले आहे. टोल पासबाबत काय नियम सेल? त्यांनी आपल्या पोस्टमध्ये, वार्षिक पास सक्रिय करण्यासाठी/नूतनीकरण करण्यासाठी हायवे ट्रॅव्हल ॲप आणि छक-ख/चेठ्ढक वेबसाइटवर लवकरच एक वेगळी लिंक उपलब्ध करून दिली जाईल, ज्यामुळे प्रक्रिया सोपी आणि त्रासमुक्त होईल. हे धोरण ६० किमीच्या परिघात असलेल्या टोल प्लाझांबद्दलच्या दीर्घकालीन चिंता दूर करेल आणि एकाच सोयीस्कर व्यवहाराद्वारे टोल पेमेंट अखंड करेल अशी माहिती दिली. गडकरी यांनी पोस्टमध्ये, फास्टॅग पासमुळे प्रतीक्षा वेळ कमी होईल. ते म्हणाले, प्रतीक्षा वेळ कमी करून, गर्दी कमी करून आणि टोल प्लाझावरील वाद दूर करून, वार्षिक पास धोरण लाखो खाजगी वाहनचालकांना जलद, सुरळीत आणि चांगला प्रवास अनुभव प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे. असेही म्हटले आहे. फक्त या वाहनांना पास मिळणार हा पास विशेषतः केवळ गैर-व्यावसायिक खाजगी वाहनांसाठी (कार, जीप, व्हॅन इ.) डिझाइन करण्यात आला आहे. देशभरातील राष्ट्रीय महामार्गांवरील वाहनांना हे लागू असेल. यामध्ये व्यावसायिक वाहनांचा समावेश नाही.

वार्षिक पासवर एक नजर:

* १५ ऑगस्टपासून सुरू होईल
* पासची किंमत ३,००० रुपये असेल.

## वेणी येथील बौध्दांच्या स्मशानभूमीवरिल अतिक्रमण हाटवण्याच्या मागणीसाठी २३ बौध्द महिलांचे अन्नत्याग आंदोलन

### जातीयवादी सरपंच, ग्रामसेवकावर कार्यवाही करा!



बुलडाणा/प्रतिनिधी :- वेणी तालुका लोणार येथील बौध्द मशानभूमीवरिल सरपंच व ग्रामसेवक यांनी हुकुमशाहीच्या जोरावर गावातील गावगुंडांना हातासी धरून २० वर्षा पासून बौध्दांच्या ताब्यात असलेली मशानभूमी त्या मशानभूमीवर जातीयवादी सरपंच व ग्रामसेवक यांनी या स्मशानभूमीवर अतिक्रमण केले आहे. हे अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी वेणी येथील २३ बौध्द महिलांनी अन्नत्याग आंदोलन बुलडाणा जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन बुलडाणा येथील टिळक नाट्य मंदीराजवळ ११ जून २०२५ पासून २३ बौध्द महीला या अन्नत्याग आंदोलनाला बसलेल्या आहे.लोणार तालुक्यातील वेणी गावातील बौध्द स्मशानभूमीतील नियोजीत जागा ही बौध्द समाजाची आहे. सदरील जागा तात्काळ महसूल प्रशासनाने मोजमाप करून स्मशानभूमीसाठी हस्तगत करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांचे कडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

वेणी येथील महिलांनी दिलेल्या निवेदनात नमुद आहे की, वेणी गावातील गट नं. १९५ मध्ये मागासवर्गीय बौध्द समाजाची स्मशानभूमी आहे.यासंबंधी ग्रामपंचायत वेणी रेकॉर्डला ८ अ नोंदनी आहे. जिल्हाधिकारी यांच्या पत्रानुसार सदर स्मशानभूमीची अभिलेखात नोंद आहे. बौध्द समाजाची जागा २० वर्षांपासून बौध्द समाजाच्या ताब्यात आहे. यामध्ये वॉलकंपाऊंड तयार करून निळा झेंडा लावण्यात आला आहे असे असतांना, सदर गावातील जातीयवादी सरपंच व सचिव यांनी लोकसंख्येच्या बळावर सदर बौध्द समाजाच्या स्मशानभूमीची जागा स्वतःच्या ताब्यात घेण्यासाठी बळाचा वापर करून संख्येच्या बळावर ठराव मंजूर करून घेतला. सत्तेचा वापर करून पोलीस संरक्षण घेऊन सदर बौध्द समाजाची जागा हे सरपंच ग्रामसेवक हे स्वतःच्या ताब्यात ठेवण्याचे मनसुबे करत आहे. सरपंच हे स्वतःच्या कर्तृत्वात कसूर करीत आहे. त्यामुळे सरपंचावर व ग्रामसेवकावर कार्यवाही करण्यात यावी तसेच वेणी गावातील जातीयवादी सरपंच यांनी ५० ते १०० गावगुंड मुलांच्या टोळ्या बौध्द वस्तीमध्ये लाठ्या काठ्या घेऊन मारण्यासाठी पाठवीतात. त्यामुळे बौध्द वस्तीमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. वेणी या गावाचा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे.तरी बौध्द समाजाची ग्रामपंचायतने दिलेली नियोजीत २० वर्षी पासूनची ताब्यात असलेली जागा बौध्द समाजाच्या ताब्यात असून त्यावर निळा झेंडा व तार कंपाऊंड काढण्यात येऊ नये व वेणी गावातील बौध्द समाजाच्या शाळकरी मुलांवर, गावातील प्रतिष्ठितवर व महिलांवर दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.या निवेदनावर मनिष जाधव,पंकज वाघ, प्रविण राजगुरू,मिना वाघ,वर्षा जाधव,सुनिता सरदार,वर्षा वाघमारे,गौतम वाघमारे, शोभा जाधव, बेबी वाघमारे,शुशिला वाघमारे यांच्यासह इतरांच्या सह्या आहेत.प्रशासनाने वेळीच ताबडतोब दखल घ्यावी जो पर्यंत बौध्दांची स्मशानभूमीची जागा ताब्यात देत नाही तो पर्यंत जीव गेला तरी चालेल पण काळे तोंड आम्ही दाखविणार नाही असा इशारा उपोषण करत्या महिलांनी दिला आहे.







## राज्यात वाढला आजारांचा प्रादुर्भाव

पुणे : प्रतिनिधी-राज्यात यंदा पावसाने मे महिन्यापासूनच जोरदार हजेरी लावली. त्यामुळे कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, कावीळ, विषमज्वर या जलजन्य आजारांचा प्रादुर्भावही वाढला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, राज्यात आत्तापर्यंत जलजन्य आजारांचे १००० हून अधिक रुग्ण आढळून आले.

पावसाळ्याचे दिवस सुरू झाल्यामुळे दूषित पाण्यातून जलजन्य आजारांचा प्रसार होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. खबरदारीचा उपाय म्हणून आरोग्य विभागाकडून काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पिण्यासाठी शुद्ध पाण्याचा वापर करावा, उघड्यावरचे अन्न, शिळे अन्न सेवन करू नये, असे आवाहन केले आहे. पिण्याचे पाणी उकळून व गार करून झाकून ठेवावे, असेही सांगण्यात आले आहे.शासनातर्फे प्रतिबंधात्मक उपाययोजना

वर्षातून दोन वेळा हिरवे, पिवळे व लाल कार्डबाबत सर्वेक्षण करण्यात येते. जोखमीच्या नसलेल्या गावांना हिरव्या रंगाचे तसेच मध्यम जोखमीच्या गावांना पिवळ्या रंगाचे कार्ड देण्यात येते. जोखमीच्या ग्रामपंचायतींना लाल रंगाचे कार्ड देऊन साथरोग प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची सूचना देण्यात येते.

## मराठवाडा साहित्य परिषदेच्या केज शाखेच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ. नवनाथ काशिद तर सचिवपदी राहुल गदळे यांची बिनविरोध निवड



केज/प्रतिनिधीमराठवाडासाहित्यपरिषदेच्याकेज शाखेच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ.नवनाथ काशिद यांची तर सचिवपदी प्राचार्य राहुल गदळे , उपाध्यक्षपदी डॉ.कविता कराड, कोषाध्यक्ष म्हणून डॉ.बी. जे.हिरवे ,कार्याध्यक्षपदी मेजर अजिमोद्दीन इनामदार, सहसचिव म्हणून विक्रम डोईफोडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या बिनविरोध कार्यकारणी निवडीबद्दल मसाप शाखेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

साहित्य परिषदेच्या केज शाखेतील मराठवाडा साहित्य परिषद आजीव सदस्य यांची स्थानिक कार्यकारिणी निवडीसाठीची बैठक दि. १५जून २०२५ रोजी सायंकाळी ५-०० वा.केज येथील शासकीय विश्रामग्रहात छत्रपती संभाजीनगर येथील मसापचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा निरीक्षक दगडू लोमटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. नूतन पदाधिकारी यांची निवड खालील प्रमाणे करण्यात आली. केज शाखा अध्यक्ष प्रा.नवनाथ काशिद उपाध्यक्ष- डॉ.कविता कराड,कार्याध्यक्ष-अजिमोद्दीन इनामदार सचिव तर सचिवपदी राहुल गदळे,सहसचिव म्हणून विक्रम डोईफोडे,कोषाध्यक्षपदी प्रा.बाबासाहेब हिरवे यांची कार्यकारणी पदाधिकारी व सदस्य निवडण्यात आले. यामध्ये अनिल गव्हाणे,बाळासाहेब लोखंडे, डॉ.सुनील राऊत, डॉ .छत्रभुज सोळंके, डॉ.हनुमंत सौदागर तर मार्गदर्शक म्हणून प्रा.ईश्वर मुंडे,जी.बी.गदळे व निमंत्रिता मध्ये माजी शाखा अध्यक्ष श्रावणकुमार जाधव, प्रा.हनुमंत भोसले यांच्यासह सर्व माजी अध्यक्ष या प्रमाणे वरील पदाधिकारी एकमताने निवडण्यात आले.

या सर्व नुतन पदाधिकाऱ्यांना संस्थापक अध्यक्ष ईश्वर मुंडे,जी.बी. गदळे यांनी शुभेच्छा दिल्या तर आभार प्रदर्शन भागवत सोनवणे यांनी केले.

# संपादकीय

## पाकिस्तानला चर्चा हवी?

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सर्व समस्यांचा निपटारा करण्यासाठी भारताने पाकिस्तानबरोबर चर्चे च्या टेबलवर यावे, असे आवाहन पाकिस्तानमधील नेते बिलावल भुट्टो यांनी केले आहे. मात्र, पाकिस्तानला भारताबरोबर खरोखरच अशी कोणती चर्चा हवी आहे का, याबाबत शंका घेण्यास वाव आहे. काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केल्यानंतर काही काळ उभय देशात झालेल्या लष्करी संघर्षामध्ये पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात हानी पोहोचली. त्यानंतर युद्धबंदी झाली.

त्यानंतर राजनैतिक पातळीवर दोन्हीही देशांनी जागतिक स्तरावर आपापले नेते पाठवून आपापल्या देशांची भूमिका मांडली. भारताने जी विविध शिष्टमंडळे पाठवली होती त्यांनी मांडलेल्या भूमिकांना जगाने चांगला प्रतिसाद दिला. त्यानंतर पाकिस्ताननेसुद्धा आपली काही शिष्टमंडळे पाठवली. त्याच एका शिष्टमंडळाचे नेतृत्व करणार्या बिलावल भुट्टो यांनी जर्मनीत काही माध्यमांशी बोलत असताना भारताला चर्चेसाठी समोर येण्याचे आवाहन केले. त्यांनी यावेळी केलेली संपूर्ण वक्तव्य पाहिली तर बिलावल भुट्टो किंवा पाकिस्तान भारताबरोबर चर्चा करण्याच्या मनस्थितीमध्ये, परिस्थितीमध्ये खरोखरच आहे का, याचा विचार करावा लागणार आहे.

सिंधूपाणी कराराबाबत भारताने जर सकारात्मक भूमिका घेतली नाही तर युद्धाशिवाय अन्य पर्याय नाही अशा प्रकारचे विधान बिलावल भुट्टो यांनी केले आहे. म्हणजे एकाच वेळी चर्चेचे आवाहन करत असताना त्यांनी युद्धाचीही तयारी दाखवली आहे. केवळ भारताने जागतिक पातळीवर आपली शिष्टमंडळे पाठवली म्हणूनच पाकिस्तानलासुद्धा अशा प्रकारची शिष्टमंडळे पाठवावी लागली. पण त्यांच्याकडे मांडण्यासाठी कोणतीच भूमिका नव्हती. साहजिकच पाकिस्तानला भारतासोबत शांततेचे संबंध हवे आहेत आणि पाकिस्तान नेहमी चर्चेसाठी तयार आहे हे दाखवण्यासाठीच अशा प्रकारचे दौरे करण्यात आले.

पण केवळ भारतच नाही तर जागतिक समुदायालासुद्धा पाकिस्तानचा इतिहास माहिती असल्याने या चर्चेच्या आवाहनाबाबत पाकिस्तान किती गंभीर आहे याची कल्पना सर्वांनाच आहे. यापूर्वी २००३ मध्ये जनरल परवेझ मुशरफ यांच्या कारकिर्दीमध्ये पाकिस्तान आणि भारत यांच्यामध्ये चर्चेबाबत गांभीर्याने पावले उचलण्यात आली होती. विविध ८ मुद्द्यांवर चर्चा सुरू झाली होती. पण त्यामध्येसुद्धा पाकिस्तानचे लष्कर आणि आयएसआय यांनी खोडा घातल्याने ती चर्चा पुढे जाऊ शकली नाही. २००८ मध्ये मुंबईवर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर तर भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये चर्चा होऊच शकली नाही.


आता तर पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेटपणे पाकिस्तानशी कोणत्याही प्रकारे चर्चा शक्य नाही, कारण दहशतवाद आणि चर्चा एकत्र जाऊ शकत नाहीत अशी भूमिका घेतली आहे. पाकिस्तानबरोबर चर्चा झालीच तर ती पाकव्याप्त काश्मीर रिकामे करण्याबाबत आणि दहशतवादाला पूर्णविराम देण्याबाबतच होऊ शकते असे अत्यंत स्पष्ट शब्दांमध्ये भारताने पाकिस्तानला बजावले आहे. याची कल्पना असूनही केवळ पाकिस्तान शांतताप्रेमी आहे हे भासवण्याच्या नादातच बिलावल भुट्टो आणि इतर अनेक नेते आपण भारताबरोबर चर्चेला तयार आहोत असे दाखवत आहेत.

भारताने सिंधू जलवाटप कराराला स्थगिती दिली असल्यामुळे पाकिस्तानची जलकोंडी झाली आहे आणि किमान भारताने या कराराचा मान राखून त्यांची या जलकोंडीतून मुक्तता करावी अशी अपेक्षा सध्या पाकिस्तानची आहे. म्हणूनच अशा प्रकारे चर्चेची आवाहने केली जात आहेत. पण भारत अशा प्रकारे कोणत्याही चर्चेच्या मूडमध्ये नसल्याने, जागतिक समूहाचा दबाव भारतावर यावा आणि त्यांनी चर्चेसाठी तयार व्हावे अशा प्रकारची रणनीती आखण्याचा प्रयत्न पाकिस्तानच्या नेत्यांकडून केला जात आहे. पण या विषयावर भारत जगातील कोणत्याही देशाचे काही ऐकेल अशी परिस्थितीत सध्या तरी नाही.

जगातील प्रमुख देशांमध्ये आपली शिष्टमंडळे पाठवून भारताने व्यवस्थित प्लॅटफॉर्म तयार केला आहे. त्यामुळे कोणत्याही जागतिक नेत्याच्या मनामध्ये पाकिस्तानबाबत सहानभूती असेल अशी शक्यता नाही. जगातील अनेक प्रमुख देश दहशतवादाला कंटाळले आहेत आणि दहशतवाद्यांचे आश्रयस्थान म्हणून पाकिस्तानसह इराण, सीरिया हे देश ओळखले जात असल्याने पाकिस्तानच्या नेत्यांकडून चर्चेच्या कोणत्याही वल्गना केल्या गेल्या तरी जागतिक पातळीवर त्याला कोणताही प्रतिसाद दिला जाणार नाही.

मुळातच पाकिस्तानला खरोखरच चर्चा हवी आहे का, याबाबत शंका घेण्यासारखी परिस्थिती आहे. साहजिकच चर्चेचे आवाहन हा केवळ पाकिस्तानचा एक देखावा असून भारतालाही त्याची कल्पना असल्याने या आवाहनाला कोणताही सकारात्मक प्रतिसाद देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. पाकिस्तान दहशतवादी कारवायांना पाठिंबा देणे थांबवत नाही तोपर्यंत त्यांच्याशी कोणत्याही प्रकारची चर्चा अशक्य आहे हे त्यांनी आता समजून घ्यायला हवे.

# स्पायडर वेब हल्ला




रशियाने युक्रेनची राजधानी किव्हवर रात्रीच्यावेळी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा केला. या अगोदर युक्रेनने रशियावर ड्रोन हल्ला केला होता. कमी किमतींचे; पण अत्याधुनिक ड्रोन उच्चस्तरीय प्रणालीलाही आव्हान देऊ शकतात, हे विशेष.

युक्रेनने 'ऑपरेशन स्पायडर वेब' म्हणजेच ड्रोनचा एक थवा रशियाच्या पाच लष्करी हवाई तळांवर सोडला होता, ज्यामध्ये ४१ बॉम्बर विमाने आगीत जळून भस्मसात झाली. रशियाचे या हल्ल्यात ७ अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले होते. युक्रेनने रशियाच्या हवाई तळांवर ड्रोनने हल्ला केला. ऑपरेशनचे नियोजन १८ महिन्यांपूर्वी सुरू झाले होते. युक्रेनने हल्ल्यामध्ये रशियाच्या मुर्मन्स्क, इर्कुत्स्क, इवानोवो, रियाझान आणि अमूर प्रदेशातील पाच हवाई तळांवर एफपीव्ही ड्रोनने हल्ले केले.

हल्ले का रोखता आले नाहीत? रशियाच्या हद्दीतून कमी उंचीवर, जवळून प्रक्षेपण : ट्रकमध्ये बसवलेल्या, लपविलेल्या कंटेनर्समधून, अनेक ड्रोन रशियाच्या हद्दीतूनच प्रक्षेपित करण्यात आले. ते अत्यंत कमी उंचीवर उडत होते, ज्यामुळे एस-४०० सारख्या लांब पल्ल्याच्या प्रणालींच्या रडार नजरेच्या/शोध क्षमतेच्या खाली होते. एस-४०० प्रामुख्याने जास्त उंचीवर उडणार्या, लांब अंतरावरील विमाने आणि क्षेपणास्त्रांसारख्या धोक्यांसाठी डिझाइन केलेले आहे. स्वतःच्या संरक्षण परिघा मागून येणार्या कमी उंचीवरील धोक्यांसाठी नाही.

गुप्तचर यंत्रणेचे अपयश : मुख्य अपयश एस-४०० प्रणालीमध्ये नसून रशियन गुप्तचर यंत्रणेमध्ये होते. युक्रेन एक वर्षापासून या ऑपरेशनची योजना करत होता आणि ड्रोन रशियामध्ये पोहोचवत होता. तरीही रशियन एजन्सीजला हा महत्त्वपूर्ण धोका वेळेवर शोधण्यात अपयश आले.

स्वार्म हल्ले आणि बचाव यंत्रणेवर ताण : एकाच वेळी मोठ्या संख्येने ड्रोन प्रक्षेपित करण्यात आले, ज्यामुळे स्थानिक बचाव यंत्रणांवर ताण आला. एस-४०० शक्तिशाली असले तरी, जर ड्रोन लहान असतील आणि खूप कमी उंचीवर उडत असतील तर समन्वित स्वार्म हल्ला अगदी प्रगत प्रणालीलाही (एस ४००) आव्हान देऊ शकतो. तैनातीतील त्रुटी आणि एअर डिफेन्सचा अभाव : काही प्रकरणांमध्ये, एस-४०० ला कमी पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणालींच्या (जसे की पँत्सिर किंवा टॉर) पुरेशा समर्थनाशिवाय एकाकीपणे तैनात केले गेले होते, ज्या कमी उंचीवरील ड्रोनचा सामना करण्यासाठी अधिक योग्य आहेत. एस-४०० हे मोठ्या हवाई संरक्षण नेटवर्कचा फक्त एक थर आहे. कमी पल्ल्याच्या प्रणालींशी (जसे की पँत्सिर-एस१ किंवा टॉर-एम२) योग्य एकत्रीकरणाशिवाय, ती काम करू शकत नाही.

एस-४०० युनिट्सना लक्ष्य करणे: युक्रेनने एस-४०० प्रणालींनाच नष्ट करण्यासाठी रणनीती वापरली गेली, क्षेपणास्त्र हल्ले करण्यापूर्वी रडार आणि अँटेनांना लक्ष्य करण्यासाठी अनेक ड्रोनचा वापर केला गेला ज्यामुळे मुख्य हल्ला होण्याआधी रक्षण रडारप्रणाली नष्ट झाली.

बचाव यंत्रणेवर ताण : स्पायडर वेब हे अनेक दिशांनी ड्रोन, क्रूझ क्षेपणास्त्रे आणि डिकॉय वापरून बहु-वेक्टर, स्वार्म-शैलीतील हल्ला करते. एस-४०० सारख्या प्रगत प्रणालींमध्येही ड्रोन, क्रूझ क्षेपणास्त्रे संख्या आणि एकाच वेळी लक्ष्य करण्याची क्षमता मर्यादित असते. मोठ्या प्रमाणावर स्वार्म हल्ला रडार आणि फायर-कंट्रोल प्रणालींवर ताण आणतो. एकदा ताण आल्यानंतर, ड्रोनसारखी कमी किमतीची लक्ष्ये संरक्षणातील फटींमधून आत येऊ शकतात.

एस-४०० : ही प्रणाली फायटर जेट्स, - एडब्ल्यूएसीएस, बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि उच्च-गती क्रूझ क्षेपणास्त्रांचा सामना करण्यासाठी अनुकूल आहे. स्वस्त, लहान एफपीए ड्रोन, लोइटरिंग दारूगोळा किंवा डिकॉय स्वार्मसाठी नाही. युक्रेन मोठ्या संख्येने कमी किमतीचे, व्यावसायिक सुधारित ड्रोन वापरत आहे, जे लाखो डॉलर्सच्या इंटरसेप्टरचा वापर नाकाम करत आहे.

इलेक्ट्रॉनिक युद्ध व स्टील्थ रणनीती : युक्रेनने आपली इलेक्ट्रॉनिक युद्ध आणि जॅमिंग क्षमता सुधारली आहे, जी काहीवेळा रडार किंवा ट्रॅकिंग प्रणाली गोंधळात टाकत आहे. काही ड्रोनमध्ये कमी रडार क्रॉस-सेक्शन्स असतात आणि ते हळू उडतात, ज्यामुळे लांब पल्ल्याच्या रडारमधून ते दिसत नाही.

युद्धाची परिभाषा बदलली स्पायडर वेब हल्ले पारंपरिक युद्धाची परिभाषा बदलत आहे. शतकानुशतके, पारंपरिक युद्ध मोठ्या सैन्ये, रणगाडे, विमाने आणि नौदलांच्या थेट संघर्षाभोवती फिरत होते. तथापि, ड्रोन तंत्रज्ञान, सायबर युद्ध आणि माहिती ऑपरेशन्सच्या वाढीमुळे रणांगण रणनीती बदलत आहे.

ड्रोन कमी शक्तिशाली घटकांना अधिक तांत्रिकदृष्ट्या प्रगत विरोधकांना महत्त्वपूर्ण नुकसान पोहोचवण्यासाठी एक किफायतशीर मार्ग आहे. तुलनेने स्वस्त ड्रोन अनेक दशलक्ष डॉलर्सच्या विमानाला नष्ट किंवा नुकसान करू शकते. स्पायडर वेब हल्ले अनपेक्षित ठिकाणांहून, कधीकधी देशाच्या हद्दीच्या आत सुरू होऊ शकतात.

गुप्तचरचे महत्त्व स्पायडर वेबसारख्या ऑपरेशन्सचे यश गुप्त माहिती गोळा करणे, घुसखोरी करणे आणि दीर्घकाळ न पकडता काम करण्याची क्षमता यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. यामुळे केवळ सामरिक मारक क्षमतेतून यश मिळत नाही. हा बदल अधिक अपारंपरिक, तंत्रज्ञान-आधारित संघर्षांकडे वाटचाल दर्शवतो जिथे चपळता, गुप्तचर पारंपरिक लष्करी सामर्थ्याइतकीच महत्त्वाची भूमिका बजावतात.

भारताकरता सावधानतेचा इशारा? अशा प्रकारचा हल्ला सर्व देशांसाठी एक मोठा इशारा आहे. ऑपरेशन स्पायडर वेबमधील धडे भारताकरता पण आहेत. कोणताही देश अत्याधुनिक ड्रोन हल्ल्यांच्या धोक्यापासून सुरक्षित नाही. केवळ पारंपरिक, लांब पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणालींवर अवलंबून राहणे आता पुरेसे नाही. देशांना सर्वसमावेशक, बहु-स्तरित संरक्षण रणनीती विकसित करण्याची आवश्यकता आहे, ज्यात काउंटर-ड्रोन तंत्रज्ञान, कमी पल्ल्याचे हवाई संरक्षण, इलेक्ट्रॉनिक युद्ध क्षमता आणि गुप्तचर नेटवर्क समाविष्ट आहेत.

राष्ट्रीय सीमांच्या आत हल्ले होण्याची शक्यता वाढल्याने, वाढीव अंतर्गत सुरक्षा उपाययोजना आणि गुप्त ऑपरेशन्सविरुद्ध सतर्कता आवश्यक आहे. जॅमर, लेझर प्रणाली आणि अगदी विशेष इंटरसेप्टर ड्रोनसह प्रभावी काउंटर-ड्रोन उपाययोजनांमध्ये संशोधन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्पायडर वेब ऑपरेशन अधोरेखित करते की भविष्यातील युद्धात पारंपरिक आणि अपारंपरिक पद्धतींचे मिश्रण असण्याची शक्यता आहे. ज्यामुळे सर्व राष्ट्रांना जटिल आणि अनपेक्षित धोक्यांच्या नवीन युगासाठी तयारी करणे आवश्यक आहे.

# लोकनेते दि बा पाटील आणि प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीचा अधिकार?



नवी मुंबई विमानतळास लोकनेते दि बा पाटील यांचे नाव देण्याचे आंदोलन आता ऐन भरात आले आहे.आगरी कोळी कराडी ओबीसी समाजाने लाखोंचा मोर्चा काढूनही सरकारला पाझर फुटत नाही.देशातील सर्वच महापुरुषांच्या बाबतीत भाजप सरकारची भूमिका संदिग्ध स्वरूपाची राहिली आहे.मालवण समुद्र किनारी बांधलेला छत्रपती शिवरायांचा पुतळा पडला.यातला भ्रष्टाचार जगासमोर आला.परंतु त्यानंतर भाजपा समर्थक अनेक लोकांची छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलची अपमानकारक जाहीर वक्तव्ये पहिली? तर या लोकांच्या मनात एक आणि ओठात दुसरेच दिसते.अलीकडे नव्याने उभारलेल्या छत्रपतींच्या पुतळ्या जवळील जमीन खचली आहे.यामध्ये भ्रष्टाचार आहेच, परंतु छत्रपती शिवराय यांच्याबद्दल,यांना आदर का नाही? असा प्रश्न साऱ्या शिवप्रेमी महाराष्ट्राला पडला आहे.

लोकनेते दि बा पाटील साहेब आपल्या जीप वर छत्रपती शिवरायांचा छोटा पुतळा अभिमाने मिरवीत असत.ती आगरी कोळी ओबीसी सामाजिक हक्कांच्या लढ्याची प्रेरणा होती.आता छत्रपती शिवरायांच्या पुतळ्या बाबतीत जी शासकीय भूमिका समोर आली.त्यानंतर लोकनेते दि बा पाटील यांच्या बाबतीत सरकारच्या मनात काय असावे?.असा प्रश्न आगरी कोळी कराडी बांधवांच्या मनात येत आहे. लोकसभा विधानसभा निवडणुका संपल्या.सरकारने विमानतळाचे नामकरण लोकनेते दि बा पाटील असे केले नाही.आमचे बरेचसे आमदार आणि मंत्री भाजपात आहेत.त्याचा प्रभाव कमी पडतोय का? लोकनेते दि बा.पाटील यांनी तरुणांसाठी खूप मोठे ऐतिहासिक कार्य केले आहे.सर्वात प्रथम महाराष्ट्रातील समस्त ओबीसी तरुणांचे ते नेते आहेत.राखीव जागाहे आरक्षणावरील छोटेखानी पुस्तक त्यांच्या ओबीसी नेते म्हणून दूरदृष्टीचे प्रतीक आहे.वर्तमान आगरी कोळी नेतृत्वाकडे ही आरक्षणाबाबत सकारात्मक दृष्टी दिसतच नाही.हिंदू वैदिक धर्माने आम्हाला मनुस्मृती,चातुवर्ण्यानुसार शिक्षण आणि नोकऱ्या, राजकारण यातील प्रतिनिधित्व नाकारले होते.लोकनेते दि बा.पाटील हे या हिंदू धार्मिक विषमते विरोधात आमचे राष्ट्रीय नेतृत्व करीत होते. ओबीसी साठी सामाजिक,आर्थिक,राजकीय न्याय देणाऱ्या मंडल आयोगाचे ते खंदे समर्थक नेते होते. त्यानंतर आम्ही असा नेता घडवू शकलो नाही. तरुणांना मोठ्या प्रमाणात नोकऱ्या, राज्य आणि देशपातळीवर यामुळे मिळू लागल्या.ज्यांना लोकनेते दि बा पाटील यांची आरक्षण समर्थनाची भूमिका मान्य झाली नाही.ते वैदिक हिंदुत्वाचे समर्थक झाले.

ओबीसी तरुणाईच्या उत्कर्षाच्या विरोधात गेले.त्यांचा करावा तेव्हढा निषेध कमीच आहे. आजही आरक्षणाचे जे विरोधक आहेत ते लोकनेते दि बा पाटील यांचे विरोधकच आहेत.जरी जातीने आगरी कोळी कराडी ओबीसी असले तरीही. सिडको जेएनपीटी ओएनजीसी येथे आक्रमक आंदोलने करून प्रकल्पग्रस्त शब्दाला छत्रपती शिवरायाच्या तलवारीची धार देणारे खरे शिवप्रेमी दि बा पाटील आहे होते.सिडको कामगार युनियनचे नेते माझे मित्र विनोद पाटील यांनी साऱ्या महाराष्ट्राला सागितले की जी प्रतिष्ठा प्रकल्पग्रस्त शब्दाला नवी मुंबई रायगड मध्ये आहे.ती देशात कुठेही नाही.यामुळेच सरकारी नोकऱ्यांच्यामुळे जीवनात प्रगती साधलेल्या सर्वच सरकारी नोकरी करणाऱ्या आगरी कोळी निवृत्त कर्मचाऱ्यांनी सरकारची भिती न बाळगता आता आंदोलनात उतरले पाहिजे.२०१३ साली लोकनेते दि बा पाटील यांचे निधन झाले.तरूणांसाठी कायद्याने लोकसभेत विधानसभेत आणि रस्त्यावर लढणारा लोकनायक हरवला.याचवेळी साडेबारा टक्के पुनर्वसन कायद्याचे विकसित रूप असलेला नवा भूसंपादन कायदा २०१३ केंद्र सरकारने आणला.सेझ, सिडको,खोत सावकार,चिरनेर जंगल लढ्यात लढणाऱ्या आगरी कोळी कराडी लोकांचा विजय या कायद्यातून दिसतो.असे असताना हा कायदा गुंडाळण्यात सरकार आणि आमच्या आगरी कोळी नेतृत्वाला विकृत यश आले.



२०१३ या नव्या भूसंपादन कायद्यानुसार एखादा प्रकल्प आला तर त्या प्रकल्पाचा सामाजिक आघात अहवाल जिल्हाधिकारी यांनी तयार करायचा असतो.त्यानुसार प्रकल्पबाधित कुटुंबाला प्रकल्पग्रस्त दाखले आणि सरकारी नोकऱ्या मिळणे हा त्यांचा अधिकार झाला.लोकनेते दि बा पाटील.नसल्याने लोकांसाठी प्रामाणिक असलेले राजकीय नेते ,सिडकोचे दलाल झाले.त्यांनी फायद्याचा असलेले २०१३ भूसंपादन कायद्यातील सरकारी नोकऱ्यांचे अस्तित्व सापविले.हा कायदा नाकारून.आगरी कोळी तरुणाईचा घात झाला.आज साडे बावीस टक्के धोरणात प्रकल्पग्रस्त दाखले सरकारी नोकऱ्या नाहीत.तरीही यासाठी न्यायालयात लढणार नाही.असे लोकांकडून लिहून घेणारे सिडको अधिकारी,आमचे राजकीय नेते डोळे मिटून दूध पिणाऱ्या बोक्याप्रमाणे, सिडको प्रकल्पग्रस्त तरुणांच्या टाळूवरील लोणी खात होते.आहेत.

आज विमानतळाची मालकी अदानी कडे आहे.खाजगी क्षेत्रात ओबीसी आरक्षण नाही,आणि प्रकल्पग्रस्त आगरी कोळी कराडी लोकांच्या नोकऱ्याही नाहीत.आपल्याच जात बांधवांना फसवून श्रीमंत शेठ झालेले राजकीय नेतृत्व हा आगरी कोळी कराडी समाजाला लागलेला महारोग आहे.प्रामाणिक राजकीय नेतृत्वासाठी तरुणांनी राजकारणात आले पाहिजे.आमचे नेते लोकनेते दि बा पाटील यांच्या सारखे,शिक्षण आरक्षण आणि प्रकल्पग्रस्त तरुणाच्या सरकारी नोकऱ्या.आणि व्यावसायिक अधिकारांसाठी लढले पाहिजे. आमच्या हक्कांच्या खडी,रेती व्यवसायांना संपविणारे ब्राह्मण क्षत्रिय वैश्य राजकीय नेतृत्व स्थानिक आमदार खासदारांना घेऊनच आमच्यावर उलटले आहेत.त्यांना ओळखा. लोकनेते दि बा पाटील याचा विचार समजून घ्या.मग आंदोलन करा.वास्तव पहा.डोके गर गर फिरू लागेल.

जय दिबा.

*******

राजाराम पाटील
८२८६०३१४६३.
उरण जिल्हा रायगड.

# है तय्यार हम म्हणत बीडसाठी २०० आपदा मित्र सज्ज!

## दहशतवादी हल्ल्याचे प्रात्यक्षिक,नैसर्गिक मानवनिर्मित आपत्तीसाठी टिम सज्ज




बीड/प्रतिनिधी जिल्हा क्रिडा संकुल, बीड येथे आयोजित १२ दिवसीय 'आपदा मित्र' प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण झाले असून, बीड जिल्ह्यात उद्भवणाऱ्या विविध आपत्तींचा सामना करण्यासाठी २०० प्रशिक्षित आपदा मित्रांची विशेष टिम सज्ज झाली आहे. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. हरीष धार्मिक, अपर जिल्हाधिकारी बीड होते. त्यांनी बीड जिल्ह्यात वारंवार उद्भवणाऱ्या पूरपरिस्थिती, विज पडणे, रस्ते अपघात, अग्निकांड अशा आपत्तीमधील आपदा मित्रांच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

या प्रशिक्षणाची संपूर्ण कार्यवाही जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. श्री. शिवकुमार स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांनी नियोजनबद्ध मार्गदर्शन करून कार्यक्रमाला दिशा दिली. प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी प्रशिक्षित आपदा मित्रांनी दहशतवादी हल्ला (बॉम्बस्फोट) झाल्यास करावयाच्या आपत्कालीन सेवेचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थित मान्यवरांची विशेष प्रशंसा मिळवली. प्रशिक्षणादरम्यान अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे उमेदवारांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून, कोणत्याही आपत्तीमध्ये तत्परतेने काम करण्याची तयारी यानिमित्ताने सिद्ध झाली आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व प्रशिक्षित आपदा मित्रांना आपत्तीच्या काळात उपयुक्त ठरणारी 'आपत्ती व्यवस्थापन किट' वितरित करण्यात आली, ज्यामध्ये प्राथमिक उपचार साहित्य, सुरक्षा साधने आणि आवश्यक बचाव उपकरणांचा समावेश होता. ही किट त्यांना प्रत्यक्ष मदत कार्य करताना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे या उपक्रमात श्री. सुधाकर टाक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, श्री. अरविंद विद्यागर जिल्हा क्रीडा अधिकारी, तसेच श्री. बाबासाहेब कोकाटे धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड व त्यांच्या संपूर्ण टीमचे मोलाचे योगदान लाभले.

# मोड आलेले कडधान्य कच्चे खावे की उकडून? जाणून घ्या तज्ज्ञांचे मत



मोड आलेली कडधान्य आरोग्यासाठी खूप पौष्टिक मानली जातात. मोड आलेल्या कडधान्यांमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असल्याने ते जेवणानंतर रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यास मदत करतात. डॉ. कँडे यांनी एका संशोधनाचा उल्लेख केला आहे, ज्यावरून असे दिसून आले आहे की कडधान्य शरीरात 'चांगले कोलेस्ट्रॉल' म्हणजेच एचडीएल (हाय-डेन्सिटी लिपोप्रोटीन) पातळी वाढविण्यासदेखील मदत करू शकतात, जे हृदयाचे आरोग्य वाढवते आणि रक्तदाब राखते.

पण, मोड आलेले कडधान्य खाण्याची योग्य पद्धत कोणती? डॉ. कँडे यांच्या मते, उकडलेले कडधान्य खाणे फायदेशीर आहे, त्याची अनेक कारणे आहेत. खाण्यापूर्वी मोड आलेले कडधान्य वाफवून किंवा शिजवून खाण्याचा सल्ला दिला जातो. याचे पहिले कारण म्हणजे ते साल्मोनेला आणि ई. कोलाईसारख्या सूक्ष्मजंतूंनी दूषित असू शकते. डॉ. कँडे म्हणतात की, अंकुरलेली कडधान्य खाण्यापूर्वी उकळून किंवा शिजवून खाल्ल्याने त्यांची पचनक्षमता वाढण्यास मदत होते. कच्चे कडधान्य आपल्या शरीरासाठी पचायला कठीण असतात. शिवाय ते आपल्या शरीराद्वारे सहज शोषले जात नाहीत.

ज्या लोकांचे आतडे संवेदनशील आणि कमकुवत असतात आणि त्यामुळे पोट फुगणे, पोटदुखी किंवा अतिसार होतो, अशा लोकांमध्ये ते पचण्यास कठीण असतात. कडधान्य शिजवल्याने अन्न विषबाधा टाळण्यास आणि पचनक्षमता सुधारण्यास मदत होईल. तथापि, उष्णतेच्या संपर्कात आल्याने व्हिटॅमिन सीसारख्या काही पोषक घटकांचे नुकसानदेखील होईल, असे डॉ. कँडे स्पष्ट करतात.

डॉक्टर कँडे यांच्या मते, गर्भवती महिला, लहान मुलं आणि वृद्धांनी कच्च्या कडधान्यांच्या सेवनाबाबत अधिक काळजी घेतली पाहिजे, कारण कच्च्या कडधान्यांमुळे होणारी अन्न विषबाधा, उलट्या आणि अतिसाराची लक्षणे त्यांच्या शरीरात अनेक आरोग्य समस्या निर्माण करू शकतात.

# अकोला येथे १० वी १२ वी पास विद्यार्थ्यांचा गुणगौरव संपन्न !!!.






अकोला / प्रतिनिधी :- पत्रकार भवन निमवाडी अकोला येथे बिल्डींग पेंटर बांधकाम व इतर असंघटीत मजूर संघ व सेस टू जस्टीस प्रकल्प इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी,अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने १० वी १२ वि च्या १२० गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती ड.अनिता गुरव अध्यक्ष बाल कल्याण समिती,राजू लाडुलकर जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांची होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश कारंडे जिल्हा संघटक होते.प्रमुख उपस्थिती: नितीन वाकोडे राज्य संघटक बुलढाणा,शेख युनुस जिल्हाध्यक्ष वाशिम,अजमत खान जि.सचिव वाशिम,सुनिल शेगोकार जि.संघटक,सत्यदेव तायडे हिवरखेड अध्यक्ष,रौनक अली बार्शिटाकली अध्यक्ष,शंकर वाघमारे जिल्हा प्रकल्प समन्वक.अकोला.पद्ममा मोहोड मंगरुळपिर अध्यक्षा,उषा लबडे पुर्व झोन अध्यक्षा,राजश्री किर्तवार मॅडम,अब्दुल बशीर उपाध्यक्ष,विनोद जपसरे,आत्माराम साठे कोषाध्यक्ष,मनोज बाविस्कर सचिव,गणेश सावळे प्र.प्रमुख,महानगर अध्यक्ष सैय्यद मकसुद,संतोष भालेराव,महा.उपाध्यक्ष झिंगाजी पुंडगे,ता,उपाध्यक्ष राजेंद्र मेसरे,गणेश राठोड हिवरखेड,नागेश नेमाडे शाखा सुकोडा तथा उप संपादक कामगार संघटक,हे प्रामुख्यांने हजर होते.

याप्रसंगी अनिता गुरव मॅडम यांनी सोशल मिडीयाचा विद्यार्थी दशात आवश्यक तेच हाताळण्याचे व घडामोडी जाणुन घेत बाल कामगार,बाल विवाह मुक्तभारत, घडविण्याचे आव्हान केले. प्रेम द्या प्रेम घ्या बाल कामगार कायद्याचे पालन करण्याचे मत व्यक्त केले. राजश्री मॅडम यांनी सर्वांना बाल विवाह मुक्त भारत करण्याची शप्पत दिली उपस्थीतांनी हि शप्पत घेतली.बाल संरक्षण अधिकारी राजू लाडूलकर यांनी एकल कुंटूब बालका साठी शासनाच्या योजनाची माहीती दिली व दत्तक योजनाचे लाभ घेण्याचे आवाहन केले,शंकर वाघमारे समन्वक जिल्हा प्रकल्प यांनी विशेषता मुलींना सोशल मिडीयाचा वापर शक्योतोर टाळण्याचे आव्हान केले यामुळे मुलीना चुकीची माहीती देऊन त्यांचे शोषण होण्याची भीती असते असे सांगितले.प्रास्ताविक राज्य संघटक नितीन वाकोडे यांनी केले,सुत्र संचालन संघटनेचे अध्यक्ष प्रशांत सुशिला किशोर मेश्राम यांनी केले आभार प्रदशन रौनक अली बार्शिटाकली अध्यक्ष यांनी केले.शहरी,ग्रामिण भागातुन विद्यार्थी व पालक वर्ग संख्येंने हजर होतेकार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धर्मदिप नंदागवळी,श्याम सोनोने,संतोष लबडे,कोमल नाईक,प्रभु इंगळे,दुर्गेश दामोदर,रुपेश थुल,सुमित वैद्य,योगेश आठवले,शेख रहिम, विशाल गजभिये,संदिप सावळे,यांनी परीश्रम घेतले व यशस्वी केले असे प्रसिध्दी प्रमुख गणेश सावळे यांनी कळविले.

# वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन

लातूर : वीरशैव लिंगायत समाज, लातूर व प्रियंका चॅरिटेबल ट्रस्ट, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २८ जुन ०२५ रोजी वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यासाठी ष . ब्र . १०८ शेती शंभूलिंग शिवाचार्य महाराज, अंबाजोगाई , भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या मान्यवरांच्या हस्ते दहावी - बारावी परीक्षेत ९० टक्के पेक्षा अधिक गुण घेतलेले विद्यार्थी, डॉक्टर, इंजिनिअर, यूपीएससी - एमपीएससी, सीए, बी. फार्म. , एम. फार्म, एल.एल.बी. , एम.बी.ए., गुणवत्तेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी दि. २७ जून २०२५ पर्यंत वीरशैव भवन, खंडोबा गल्ली, लातूर या ठिकाणी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. शनिवार, दि. २८ जून रोजी दुपारी अडीच वाजता वीरशैव सांस्कृतिक भवन येथे होणाऱ्या या सत्कार सोहळ्यास समाजातील विविध स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ,असे आवाहन उमाकांत कोरे, नागेश कानडे, तम्मा चौंडा, सुनील भिमपुरे , दिलीप होनराव, बालाजी पिंपळे, वैभव विभूते , महेश कोळळे , प्रा.आशिष स्वामी, एड. पंकज कोरे, कमलाकर खराबे यांसह वीरशैव लिंगायत समाजातील सर्व मान्यवरांनी केले आहे.

### थंड पाण्याने अंघोळ करणं 'या' लोकांना ठरु शकते घातक! शरीरावर काय परिणाम होतात, वाचा

बहुतांश जण उन्हाळा असो किंवा पावसाळा गरम पाण्याने अंघोळ करून दिवसाची सुरुवात करतात, यामुळे आळसपणा कमी होतो आणि दिवसाची सुरुवात चांगली होते असा समज आहे. मात्र, काही जणांना थंड पाण्याने अंघोळ करण्याची सवय असते. ऋतू कोणताही असो ते बारा महिने अंघोळीसाठी थंड पाण्याचा वापर करतात. थंड पाण्याने अंघोळ करण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. यामुळे शरीराची होणारी जळजळ, त्वचेवरील खाज कमी होते, शरीरास चांगली ऊर्जा मिळते; पण थंड पाण्याने अंघोळ करणं प्रत्येकासाठीच फायदेशीर नाही.

काही लोकांना थंड पाण्याने अंघोळ केल्याने विविध आरोग्य समस्यांचा सामना करावा लागू शकतो. तसेच आधीच कोणत्याही आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांना तर त्याचे वेगळे दुष्परिणाम भोगावे लागू शकतात. पण, नेमक्या कोणत्या लोकांनी थंड पाण्याने अंघोळ करणं टाळलं पाहिजे जाणून घ्या. इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना मुंबईतील ग्लेनेगल्स हॉस्पिटलमधील इंटरनल मेडिसिन सीनियर कन्सल्टेंट डॉ. मंजुषा अग्रवाल यांनी म्हटले की, दीर्घकाळापासून मधुमेह किंवा श्वसनासंबंधित आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांनी दररोज थंड पाण्याने अंघोळ करणे टाळावे. तसेच रोगप्रतिकारक शक्ती कमकूवत असलेल्या किंवा दीर्घकाळापासून विविध आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांनी थंड पाण्याने अंघोळ केल्यास आरोग्यस्थिती गंभीर होऊ शकते. तसेच बरं होण्याची प्रक्रिया मंदावू शकते, त्यामुळे नियमितपणे थंड पाण्याने अंघोळ करण्यापूर्वी वैद्यकीय सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. तज्ज्ञांच्या मते, 'या' लोकांनी थंड पाण्याने अंघोळ करणे टाळावे. १) हृदयविकार असलेले लोक थंड पाण्याने अंघोळ केल्याने रक्तवाहिन्या अचानक आकुंचन पावू शकतात, ज्यामुळे रक्तदाब आणि हृदयाची गती वाढते. कोरोनरी आर्टरी डिसीज किंवा हार्ट फेल्युअरसारख्या हृदयरोग असलेल्या लोकांची स्थिती आणखी बिकट होऊ शकते आणि हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोकचा धोका वाढू शकतो.

दिल्लीतील सीके बिर्ला हॉस्पिटलमधील इंटरनल मेडिसिनमधील प्रमुख सल्लागार डॉ. नरेंद्र सिंघला यांनी भर दिला की, या जीवघेण्या गुंतागुंती टाळण्यासाठी हृदयरोग असलेल्यांनी थंड पाण्याने अंघोळ करणे टाळावे.

२) उच्च रक्तदाब असलेले लोक

डॉ. सिंघला यांनी अधोरेखित केले की, उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींना हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आजारांचा धोका जास्त असतो. अशा लोकांनी थंड पाण्याने अंघोळ केल्यास रक्तदाब वाढू शकतो, तसेच आधीच उच्च रक्तदाब असलेल्या लोकांना याचा अधिक धोका आहे. रक्तदाब अचानक वाढल्याने स्ट्रोक, हृदयविकाराचा झटका किंवा इतर हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आजार होऊ शकतात.

४) स्ट्रोकचा धोका असलेले लोक

डॉ. सिंघला म्हणाले की, ज्या लोकांना स्ट्रोक किंवा सेरेब्रोव्हस्कुलर आजारांचा इतिहास आहे, अशा लोकांनी थंड पाण्याने अंघोळ करताना सावधगिरी बाळगली पाहिजे. अचानक शरीराच्या तापमानात बदल झाल्याने रक्तदाबात तीव्र वाढ होऊ शकते, यामुळे वारंवार स्ट्रोक येण्याचा धोका वाढू शकतो. याच कारणास्तव स्ट्रोकचा धोका असलेल्या लोकांनी रोज थंड पाण्याने अंघोळ करण्यापूर्वी आरोग्यतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

५) रेनॉड रोग असलेल्या व्यक्ती रेनॉड रोग हा एक असा आजार आहे

# कालकथित : यशोदा दुपारगुडे यांचे दुखद निधन - के. रवि.( दादा ) यांना मातृशोक





मुंबई प्रतिनिधी / के. रवि. (दादा) हे एक सामाजिकचळवळीतील कार्यकर्ते, चित्रपट निर्माते इंडिया मीडिया लिंक आणि इव्हेंट मॅनेजमेंट चे प्रमुख, जेष्ठ पत्रकार के. रवि. दादा यांच्या मातोश्री काल कथित : यशोदा शिवाजी दुपारगुडे यांचे वृद्धापकाळाने गुरुवार दिनांक १२ जून २०२५ रोजी अ अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचा पुण्यानुनुमोदन कार्यक्रम गरोडिया नगर घाटकोपर येथील 'लेव्हेंडर बग' सभागृहा मध्ये रविवार १५ जून २०२५ रोजी कार्यक्रम पार पाडला. यावेळी चित्रपट सृष्टीतील अनेक कलावंतासह सामाजिक, राजकीय, कामगार क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहुन कालकथित मातोश्री : यशोदा शिवाजी दुपारगुडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. दैनिक महावृत्त परिवार आपल्या दुःखात सामील आहोत मातोश्रीच्या चरणी भावपूर्ण आदरांजली

# सुरेश वाघमारे यांची (आसप) च्या उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष पदी चौथ्यांदा निवड




मुंबई / प्रतिनिधी :- आंबेडकरी चळवळीतील युवा आंदोलक तथा पत्रकार सुरेश वाघमारे यांची खासदार ॲड,चंद्रसेखर आजाद यांच्या आजाद समाज पार्टी च्या उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष पदी नुकतीच घाटकोपर विश्व रत्न डॉ, बाबासाहेब आंबेडकर शहिद स्मारक हॉल मध्ये आजाद समाज पार्टी कांशीराम या पार्टीची मुंबई प्रदेश कार्यकारणी निवड व कार्यकर्ता समीक्षा बैठक घेण्यात आली, यावेळी प्रामुख्याने राष्ट्रीय प्रभारी महाराष्ट्र प्रदेश गौरिप्रसाद उपासक, महाराष्ट्र अध्यक्ष मनीष साठे, मुबंई प्रदेश प्रभारी, सत्यजित साळवे, हे प्रामुख्याने उपस्थित होते यावेळी गौरिप्रसाद उपासक यांनी महिला मोर्चा च्या महाराष्ट्र प्रभारी पदी नेहाताई शिंदे, यांना पदोन्नती दिली तर योगिनी पगारे यांना खासदार ॲड भाई चंद्रशेखर आजाद यांच्या आदेशानुसार आसपा महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदी निवड घोषित केली, तसेच मुंबई प्रदेश अध्यक्ष पदी कैलास जैस्वार यांना पुन्हा संधी दिली याच बैठकीत सुरेश वाघमारे यांना सलग चौथ्यांदा उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष पदाची धुरा सोपविली पक्षाला एकनिष्ठ आणि प्रामाणिक पणा दाखवील्यामुळे तसेच संघटन कौशल्य, आणि आंदोलक चेहरा म्हणून सुरेश वाघमारे यांची पुन्हा निवड केली असून वाघमारे हे भीम आर्मी चे सुद्धा जिल्हा अध्यक्ष होते नन्तर पार्टी मध्ये प्रवेश घेत राजकीय समीकरनात सक्रिय झाले, त्यांच्या या निवडीबद्दल, मालाड विधानसभा अध्यक्ष असगर अली मन्सूरी, मागाठाणे विधानसभा अध्यक्ष मुकेशकुमार गौतम, दहिसर विधानसभा विकास प्रजापती, श्याम केळकर, वॉर्ड क्रमांक ४९अध्यक्ष गजानन तांबे, आकाश ओव्हाळ, आदिसह जिल्ह्यातील विविध संस्था संघटना, राजकीय पक्षाकडून स्वागत होत आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवीन नियम, इतक्या दिवसांपेक्षा जास्त सुट्ट्या घेतल्यास नोकरी जाणार

सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि शिस्तीला प्राधान्य देणारी बातमी समोर आली आहे. ७ व्या वेतन आयोगांतर्गत केंद्र सरकारने रजा धोरणात नव्याने स्पष्टता आणणारे नियम जाहीर केले आहेत.

या नव्या नियमांमुळे अनेक कर्मचारी संभ्रमात आणि चिंतेत असूनही, प्रशासनाने यामागे शिस्त आणि कार्यक्षमता वाढवण्याचा उद्देश स्पष्ट केला आहे.

या नव्या धोरणामुळे सरकारी कर्मचाऱ्यांनी रजा घेताना अधिक जागरूक राहावे लागणार आहे. कारण आता सतत दीर्घकालीन अनुपस्थिती केवळ गैरहजर राहणं न ठरता, नोकरी जाण्याचं कारणही ठरू शकते. या धोरणाची अंमलबजावणी करताना प्रशासनाने काही विशिष्ट बाबींवर सवलतीही दिल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, जर एखादा कर्मचारी पाच वर्षांपर्यंत कोणतीही नियोजित किंवा अधिकृत रजा न घेता सेवेतून अनुपस्थित राहिला, तर अशा कर्मचाऱ्याला आपोआपच नोकरीवरून मुक्त झालं असल्याचं मानण्यात येईल. म्हणजेच, शासन अशा प्रकरणांमध्ये वेगळं निलंबन किंवा सेवा समाप्तीचं आदेश देणार नाही, तर ही कारवाई स्वयंचलितपणे लागू होईल. या अटीमुळे प्रशासनात वेळेवर उपस्थित राहण्याला अधिक महत्त्व प्राप्त होणार आहे. मात्र, ही अट परदेशात सेवेत असलेल्या अधिकाऱ्यांवर लागू होणार नाही, याची स्पष्ट तरतूदही करण्यात आली आहे.

सरकारने आता रजा संदर्भातही ठरावीक नियम निश्चित केले आहेत. एलटीसी रजा सुद्धा काही विशिष्ट परिस्थितीतच मागाहून मंजूर होऊ शकते. सर्वसाधारणपणे ही रजा आगाऊ मंजुरीनेच स्वीकारली जाणार आहे. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी आपली रजा योग्य नियोजनानुसार आणि अधिकृत प्रक्रिया पूर्ण करूनच घ्यावी, असा सरकारचा स्पष्ट इशारा आहे. शासकीय कर्मचाऱ्यांसाठी अभ्यासासाठी रजा घेण्याचे नियमही स्पष्ट करण्यात आले आहेत. कोणत्याही कर्मचाऱ्याला त्यांच्या संपूर्ण सेवेत २४ महिन्यांपर्यंत अभ्यासासाठीची रजा मंजूर होऊ शकते. मात्र, केंद्रीय आरोग्य सेवांतील अधिकाऱ्यांसाठी ही कालमर्यादा ३६ महिने करण्यात आली आहे. यामध्ये एका वेळी कमाल एका वर्षासाठीच रजा घेता येणार आहे.

सरकारने बालकांच्या देखभालीसाठीही विशिष्ट रजांची तरतूद केली आहे. जर कर्मचारी पुरुष किंवा महिला यांचे मूल परदेशात शिक्षण घेत असेल, आणि त्या मुलाच्या देखभालीसाठी संबंधित कर्मचाऱ्याला त्याच्यासोबत परदेशात राहणं आवश्यक असेल, तर निश्चित अटींच्या अधीन राहून रजा मंजूर केली जाऊ शकते. यामुळे कुटुंबाची काळजी आणि सेवेत संतुलन राखण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे.

या नव्या धोरणामुळे सरकारने स्पष्ट संदेश दिला आहे की, अनुशासन आणि नियोजनाचे पालन केल्याशिवाय सरकारी सेवेत टिकून राहणं अशक्य होईल. नव्या नियमांचे पालन केल्यास कर्मचारी सुरक्षित राहू शकतात, पण नियम तोडल्यास कारवाई टाळता येणार नाही.

## अपंग बांधवास मोफत ट्राय सायकल भेट



लातूर/प्रतिनिधी:- रुग्ण हक्क संरक्षण समिती - बागवान सोशल फौंडेशन बार्शी यांच्या तर्फे सामाजिक बांधिलकी म्हणून लातूर येथे अहमदपूर येथील गुलाब पठाण या गरीब अपंग बांधवास मोफत विकलांग ट्राय सायकल भेट देण्यात आली या प्रसंगी रुग्ण हक्क संरक्षण समिती संस्थापक अध्यक्ष अँड निलेश करमुडी, बागवान सोशल फौंडेशन बार्शी चे अध्यक्ष तथा रुग्ण हक्क संरक्षण समितीचे बार्शी तालुका अध्यक्ष जुबेर बागवान यांच्या हस्ते अपंग बांधवास शाल, कपडे,फळे पुष्पगुच्छ देऊन सन्मानाने विकलांग ट्राय सायकल भेट देण्यात आली. सदर सामाजिक उपक्रम राबविले बद्दल रुग्ण हक्क संरक्षण समिती आणि शिवसम्राट विद्यार्थी वाहतूक सेनेच्या वतीने जुबेर बागवान यांचा पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला याप्रसंगी शिवसम्राट विद्यार्थी वाहतूक सेनेचे संस्थापक अध्यक्ष हणमंत गोत्राळ, जिल्हाअध्यक्ष रामकृष्ण साळुंके, संदीपान मोरे,संतोष घोगरे, तानाजी शिंदे, तुकाराम पवार, अहमद शेख, सुनिल वाघमारे, अश्रुबा, अँड धंनजय मस्के, अँड नितीन सौदागर, दत्ता होळकर, राजू बंडे, आदी उपस्थित होते

## आशादीप परिवार आणि मनपाच्या संयुक्त विद्यमाने १२१ टीबी रुग्णांना न्यूट्रिशनल सपोर्ट किटचे वाटप

लातूर :- येथील आशादीप परिवार आणि लातूर शहर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री टीबी मुक्त अभियान अंतर्गत १२१ टीबी रुग्णांना मंगळवार, दि. १७ जून २०२५ रोजी न्यूट्रिशनल सपोर्ट किटचे वाटप करण्यात आले. या अभिनव उपक्रमास लातूर शहर महानगरपालिकेच्या नूतन आयुक्त सौ. मानसी मीना यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी आशादीप परिवाराचे सर्वश्री डॉ. अशोक पोद्दार, रामेश्वर सोमाणी, विजय पस्तापुरे , श्याम धूत, राजू मिनियार, नरेंद्र भुतडा, संजीव भार्गव, रतन बिदादा आदी मान्यवरांनीही उपस्थिती होती. लातूर शहरांमध्ये फूड बास्केट देण्याचा राबवण्यात येणारा उपक्रम हा अत्यंत स्तुत्य असून यामुळे मला आनंद झाला आहे, असे मत मनपा आयुक्त श्रीमती मानसी मीना यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच आरोग्य विभाग मनपा यांच्या या कामी समन्वयाबद्दल कौतुक केले. फक्त यावरच न थांबता टीबी रुग्णांना वर्षभराकरिताचे न्यूट्रिशनल किटचा पुरवठा होणेकामी नियोजन करण्याच्या सूचना देखील त्यांनी यावेळी दिल्या. लातूर जिल्हा क्षयरोग मुक्त करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत मोफत औषधींचा पुरवठा करण्यात येतो. परंतु औषधासोबतच रुग्णाच्या पूर्ण बरे होण्याकरिता आवश्यक असणाऱ्या पोषण आहाराच्या पूर्ततेसाठी लोक सहभागामधून न्यूट्रिशनल सपोर्ट किट देऊन निक्षय मित्र होता येते. निक्षय मित्र होण्याची प्रेरणा घेऊन लातूर शहरामधील नामांकित अस्थिशल्य चिकित्सक डॉ. अशोक पोद्दार यांनी टीबी रुग्णांकरिता त्यांच्या मित्रमंडळींना देखील या कामी सक्रिय योगदान देण्याकरिता प्रोत्साहित केले आहे, याबद्दल सौ. मानसी मीना यांनी डॉ. पोद्दार यांच्या कार्याचेही कौतुक केले. वैद्यकीय सेवेसोबतच डॉ.अशोक पोद्दार सामाजिक कार्यातही अग्रेसर असतात. आपल्या मित्र परिवारांनाही सामाजिक कार्यात सहभागी होऊन




वेळोवेळी अशा प्रकारची मदत करण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. त्याचप्रमाणे आशादीप परिवाराचे सदस्य संजीव भार्गव यांनी दक्षिण आफ्रिकेत पार पडलेल्या कॉम्रेड्स मॅरेथॉनमध्ये ९१ किमी अंतर निर्धारित वेळेत यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचा मनपा आयुक्त सौ. मानसी मीना यांच्या हस्ते याप्रसंगी सत्कार करण्यात आला. कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये एकूण ४१३ भारतीयांनी सहभाग नोंदविला असून त्यामध्ये लातूरच्या तिघांचा समावेश होता. संजीव भार्गव यांच्या व्यतिरिक्त लातूरचे डॉ. ब्रिजमोहन झंवर व डॉ. आरती झंवरही या मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले होते. यावेळी टीबी रुग्णांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते न्यूट्रिशनल किटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ऋषिकेश खरोळकर यांनी केले. यावेळी दात्यांसह मनपाचे सर्व वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी यांच्यासह आशा स्वयंसेविका आणि क्षयरोग विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## भदन्त डॉ. उपगुप्त महाथेरो यांना मिळाला हिमालयीन योगा वर्ल्ड पिस पुरस्कार




बीड /प्रतिनिधी :- महाबोधी इंटर नॅशनल मेडिटेशन सेंटर (चखचउ) लेह लडाख येथे दि.१५.०६.२०२५ रोजी -जागतिक योगा व मेडीटेशन उत्सव-२०२५ झालेल्या कार्यक्रमात पूर्णा येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे अध्यक्ष, भदन्त डॉ. उपगुप्त महाथेरो यांना हिमालयीन योगा वर्ल्ड पिस पुरस्कार बिहारचे राज्यपाल महामहिम आरिफ महम्मद खान यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाबोधी इंटर नॅशनल मेडिटेशन सेंटर, लेह-लडाखचे संस्थापक अध्यक्ष भिक्खू संघसेना हे होते. संस्थेच्या विद्यमाने सर्वप्रथम महामहीम राज्यपाल आरिफ महम्मद खान यांचा स्मृतिचिन्ह, शाल देऊन सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक भन्ते संघसेना यांनी केल्यानंतर मा. राज्यपाल यांचे योगा व विपस्सना बद्दल समायोचित भाषण झाले या कार्यक्रमासाठी भारत-नेपाळचे राजदूत डॉ. शंकरप्रसाद शर्मा, लडाखचे खासदार हाजी हानिफा जन, डॉ. सदनामसिंग संधु (राज्यसभा सदस्य तथा चंडीगड विद्यापिठाचे कुलगुरू) तसचे लडाख बुध्दीस्ट असोसिएशनचे प्रसिडेंट मा.श्रींग डोरजे लकरूक, मिनिस्ट्री ऑफ आयुष मंत्रालय भारत सरकारचे डॉ. राधेंद्र रॉय, डायरेक्टर, हेल्थ सर्विसेस लडाखचे डॉ. ताशी थिनर्लेस, हिमांशु सोनी - सिने अभिनेता-मुंबई, व्हाईस चॅन्सलर लडाखचे प्रोफेसर पुष्पा, अॅडिशनल सेक्रेटरी ण.ढ. लडाख विक्रमसिंग मलिक व इत्यादी मान्यवर उपस्थिन होते. पशालेय विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय एकात्मा या सांस्कृतिक कार्यक्रमाने सांगता झाली. महाराष्ट्र व देशात बौद्ध धम्म प्रसारक पु भन्तेजी यांना पुरस्कार प्राप्त झाल्या बद्दल बीड जिल्ह्यातील पु भन्तेजी धम्मशील प्रा प्रदिप रोडे , राजेंद्र घोडके , चंद्रकांत इंगळे ड अनंतराव जगतकर , नागेश जौंधळ , प्रा गौतम गायकवाड , प्रा बालाजी जगतकर यांनी अभिनंदन केले आहे

## जि. प. प्रा.शा.सांगवी सा. शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

केज/प्रतिनिधी जि. प. प्रा.शा.सांगवी सा. शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सुरुवात झालेली असुन प्रत्येक शाळेत प्रवेशोत्सव साजरे केले जात आहेत. त्यापैकीच सांगवी सा शाळेत आगळा वेगळा प्रवेशोत्सव साजरा करत पालकांचे व नवगतांचे लक्ष वेधले गेले..



पारंपारिक पध्दतीने बैलगाडी सजवुन, बँड पथक लावून पूर्ण गावात नवीन प्रवेश घेतलेल्या इयत्ता १ ली वर्गातील मुलं मुलींची मिरवणूक काढण्यात आली.जागोजागी रांगोळ्या, पुष्पवृष्टी करण्यात आली. नवीन विद्यार्थ्यांचे गावात जागोजागी महिला सदस्यांनी औक्षण करत या चिमुकल्याना शुभेच्छा व आशीर्वाद दिले.. या मुलांचे पायाचे ठसे घेऊन माझे शाळेत पहिले पाऊल म्हणून शाळेच्या परिसरात लावण्यात आले..सर्व शाळा व प्रत्येक वर्ग फुलांनी, फुग्यानी, झिरमाळ्या, पताका यांनी सजवुन वातावरण निर्मिती करण्यात आली होती..

पालकांना गावकऱ्यांना या वेळी या वर्षी पहिली वर्गापासून सुरु होणाऱ्या सी.बी.एस.ई अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली. गावकरी,पालकयांच्याहातूनमोफतपाठयपुस्तकंवाटपकरण्यातआले.

अगदी आनंदात, उत्साहात प्रवेशोत्सवं साजरा करण्यात आला या वेळी शाळेतील सहशिक्षक सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री जगताप गणेश यांनी मेहनत घेतली. पालकांना शाळेच्या विकासाबाबत व प्रगतीबाबत जागृतीचे आवाहन मुख्याध्यापक श्री महादेव ढाकणे यांनी केले तर सी.बी.एस.ई अभ्यासक्रमबाबत माहिती सहशिक्षिका श्रीम.नयना शिंदे यांनी दिली..

## प्रत्येक कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य सामाजिक उन्नतीसाठी खर्च करावे-श्रीमती मंगलाताई खांडेकर

बीड/प्रतिनिधी शासकीय अथवा निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यांनी नंतरचे आयुष्यात समाजाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी आणि सामाजिक कार्यासाठी खर्च करावे असे आवाहन बडे बाबा शिक्षण संस्थेच्या सचिव श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम यांनी श्री नारद स्वामी विद्या मंदिर या शाळेतील सेवक नितीन दादा वाघमारे यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. यावेळी व्यासपीठावर युवा संचालक श्री प्रसाद संपतराव खांडेकर, शाळेचे मुख्याध्यापक श्री पाखरे सर, लहूजी शक्तीसेना(अध्यक्ष मराठवाडा) विजय चांदणे, जेष्ठ शिक्षक कागदेसर, सिरसट सर, दाबेकर मॅडम, जाधव, राठोड, सेवक इतापे आदी कर्मचारी उपस्थित होते.

बीड शहरातील नवीन मोंढा मंदिर एम. आय. डी. रोड परिसरात असलेल्या श्री नारद स्वामी विद्या मंदिर या शाळेतील



श्री सेवक नितीन दादा वाघमारे हे नुकतेच नियत वयोमानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम या होत्या. या वेळी नितीन दादा वाघमारे यांच्या विषयी काही मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना वाघमारे यांच्या जीवनाविषयी व कार्याविषयी माहिती सांगितली. त्यांचे विचार त्यांच्या कामाचे उदाहरणासह काही किस्से विषद केले. त्यानंतर अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम म्हणाल्या की आमच्या संपूर्ण संस्थेमध्ये श्री नितीन वाघमारे हे अत्यंत, शांत संयमी आणि सदैव हसमुख चेहऱ्याचे होते. त्यांनी प्रामाणिकपणे आपली शाळेतील नोकरी यशस्वीरित्या पार पाडली. सेवक हा शाळेचा महत्वाचा घटक असतो. उद्यापासून नितीन वाघमारे हे आपलं कर्तव्य बनवताना दिसणार नाहीत. परंतु त्यांची आठवण मात्र कायम येत राहिल. शासकीय अथवा निमशासकीय सेवेत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची जनतेशी नाळ निर्माण झालेली असते. त्यामुळे सेवानिवृत्तीचा काळ हा सामाजिक सेवेत घालवायचा काळ असतो. एकंदरीतच वाघमारे हे देखील सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य सामाजिक उन्नतीसाठी खर्च करतील अशी अशा आहे. त्यांच्या आयुष्याच्या दुसऱ्या इनिंगसाठी माझ्या आणि आपल्या सर्व परिवाराच्या खूप खूप शुभेच्छा आणि सदिच्छा आहेत जीवनातील प्रत्येक प्रसंगी आम्ही आपल्यासोबत कायम आहोत असेही यावेळी श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम यांनी सांगितले. या कार्यक्रमास श्री नारदस्वामी विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,शिक्षण प्रेमी नागरिक, पालक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE